नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - २ रे Year - 2nd | अंक - १६९ Issue - 169 | वार बुधवार दि. ६ नोव्हेंबर २०२४ Blow- Wednesday Date 6 November 2024 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## थोडक्यात

### बाळे येथे कारच्या धडकेत एकाचा मृत्यू

सोलापूर : बाळे येथे एका कारचालकाने त्याच्या कारचा दरवाजा अचानक उघडल्याने कारच्या दरवाज्याला धडकून दुचाकी वरील एकाचा मृत्यू झाल्याची घटना २२ ऑक्टोंबर रोजी दुपारी बारा वाजण्याच्या सुमारास घडली. याप्रकरणी भास्कर जगन्नाथ माडीकर (वय-५७,रा.मुरारजी पेठ,निर्मल नगर) यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून श्रीकृष्ण प्रकाश सुरवसे (राहणार माहित नाही) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. याबाबत अधिक माहिती अशी की,फिर्यादी यांचा चुलत भाऊ रवींद्र माडीकर हा त्याची दुचाकी क्रमांक एमएच.१३.बीके.३४८० वरून सोलापूर ते बार्शी रोडने जात असताना बाळे या ठिकाणी बार्शीकडे जाणारी कार क्रं.एमएच.०२.सीडब्लू.९९२४ यातील चालक याने त्याच्या ताब्यातील कारचा दरवाजा हयगयीने अचानक उघडल्याने फिर्यादी यांची दुचाकी कारच्या दरवाजाला जोरात धडकून फिर्यादी यांचा चुलत भाऊ रवींद्र यांच्या डोक्याला गंभीर जखम होऊन मयत झाला आहे. असे फिर्यादित नमूद आहे. पुढील तपास पोलीस हवालदार घुगे हे करीत आहेत.

### इंडिया आघाडीचा झारखंडसाठी जाहीरनामा प्रसिद्ध

रांची : इंडिया महाआघाडीने मंगळवारी झारखंड विधानसभा निवडणुकीसाठी आपला जाहीरनामा प्रसिद्ध केला. त्यामध्ये तरुणांना १० लाख नोकऱ्या देण्याचे आश्वासन देण्यात आले आहे. तसेच गरीबांना १५ लाख रुपयांच्या आरोग्यविम्याचे संरक्षण दिले जाईल असेही सांगितले आहे. इंडिया आघाडीने एकूण ७ हमींचा जाहीरनामा प्रसिद्ध केला आहे. या ७ हमींमध्ये वंचित समाजगटांसाठी आरक्षणाचेही आश्वासन देण्यात आले आहे. त्यामध्ये राज्यात सत्तेवर आल्यास अनुसूचित जातींसाठी २८ टक्के (सध्या २६ टक्के), अनुसूचित जमातींसाठी १२ टक्के (सध्या १० टक्के) आणि इतर मागासवर्गीयांसाठी २७ टक्के (सध्या १४ टक्के) आरक्षण देण्याची महत्त्वपूर्ण घोषणा करण्यात आली आहे. काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, झारखंडचे मुख्यमंत्री हेमंत सोरेन आणि राष्ट्रीय जनता दलाचे जे पी यादव यांनी संयुक्तरित्या जाहीरनामा प्रसिद्ध केला.

# प्रत्येक वैयक्तिक मालमत्ता समाजासाठी उपयुक्त संपत्ती असू शकत नाही

## सर्वोच्च न्यायालयाचे दोन निर्णय; मदरसा शिक्षण मंडळ कायदा घटनात्मक; योगी आदित्यनाथ सरकारला झटका

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : सर्वोच्च न्यायालयाने आज वैयक्तिक मालमत्तेबाबत महत्त्वाचा निर्णय सुनावला आहे. या प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने निर्णय देताना म्हटलंय की प्रत्येक व्यक्तीची प्रत्येक संपत्ती समाजासाठी उपयुक्त मालमत्तेचे संसाधन असेलच असं नाही. म्हणजे, प्रत्येक व्यक्तीची प्रत्येक मालमत्ता समाजासाठी वापरता येईलच असं नाही. सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश डी. वाय. चंद्रचूड यांच्या अध्यक्षतेखाली नऊ न्यायाधीशांनी मंगळवारी (५ नोव्हेंबर) हा निर्णय सुनावला. स्वतःच्या कमाईची खासगी मालमत्ता संविधानाच्या अनुच्छेद ३९ (बी) अंतर्गत समाजासाठी उपयुक्त मालमत्ता मानली जाऊ शकत नाही, असं या घटनापीठाने आज निर्णय दिला.

घटनापीठाने तीन भागातील हा निर्णय सुनावताना म्हटलंय की, काही खासगी मालमत्ता समाजासाठी उपयुक्त संपत्ती असू शकते, पण प्रत्येक खासगी मालमत्ता समाजासाठी उपयुक्त संसाधन असू शकत नाही.

न्यायाधीश हृषिकेश रॉय, बीवी नागारत्ना, जेबी पारडीवाला, सुधांशू धूलिया, मनोज मिश्रा, राजेश बिंदल, सतीश चंद्र शर्मा आणि ऑगस्टिन जॉर्ज मसीह या घटनापीठात समाविष्ट होते.

कलम ३९ (बी) अंतर्गत सार्वजनिक आणि खासगी मालमत्ता समाजाच्या उपयुक्त संपत्तीच्या कक्षेत येतात असा निर्णय कर्नाटक कोर्टाने १९७७ साली दिला होता. तर, संजीवव कोक मॅन्युफॅक्चरिंग कंपनी विरुद्ध भारत कुकिंग कोल लिमिडेट प्रकरणातही १९८२ साली घटनापीठने न्यायमूर्ती अय्यर यांच्या मताचं समर्थन करण्यात आलं होतं. परंतु, न्यायमूर्ती अय्यर यांचं मताला आता सर्वोच्च न्यायलयातील बहुसंख्य न्यायाधीशांनी असहमती दर्शवली आहे.



**मदरसा शिक्षण मंडळ कायदा घटनात्मक**

'उत्तर प्रदेश मदरसा शिक्षण मंडळ कायदा, २००४' रद्द ठरवण्यास सर्वोच्च न्यायालयाने नकार देत या कायद्याची घटनात्मक तरतूद कायम असल्याचा निर्वाळा दिला. यामुळे मार्च महिन्यात अलाहाबाद उच्च न्यायालयाने दिलेल्या निकालाला अखेर स्थगिती मिळाली आहे. या कायद्यामुळे धर्मनिरपेक्ष तत्त्वाला तडा जात असल्याचे सांगून हा कायदा रद्द करण्याचा निर्णय उच्च न्यायालयाने दिला होता. त्यानंतर सर्वोच्च न्यायालयात हे प्रकरण गेले असता एप्रिल महिन्यात सर्वोच्च न्यायालयाने उच्च न्यायालयाच्या निकालाला अंतरिम स्थगिती दिली होती. यामुळे उत्तर प्रदेशमध्ये मदरशात शिक्षण घेणाऱ्या लाखो विद्यार्थ्यांना दिलासा मिळाला आहे.

मार्च महिन्यात उच्च न्यायालयाने सदर कायद्याला स्थगिती देऊन मदरशात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना इतर शाळांमध्ये दाखल होण्याचे आदेश दिले होते. त्यानंतर या निर्णयाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले गेले. 'उत्तर प्रदेश मदरसा शिक्षण मंडळ कायद्यामुळे एनसीईआरटीच्या अभ्यासक्रमासह धार्मिक शिक्षण देण्याचीही तरतूद आहे. या कायद्यानुसार मदरसा शिक्षण मंडळावर मुस्लीम सदस्यांची नियुक्ती केली जाते. कायद्याच्या कलम ९ मध्ये मंडळाचे काम कसे चालणार? याबाबत दिशानिर्देशन केले गेले आहे. अभ्यासक्रम कसा असेल? तसेच परीक्षा घेण्यासाठी मौलवींपासून ते फाजिलपर्यंत काय जबाबदाऱ्या आहेत? याची माहिती या कलमात आहे.

सर्वोच्च न्यायालयात बाजू मांडताना उत्तर प्रदेश सरकारने सांगितले की, या कायद्याला घटनात्मक आधार आहे. यावर सरन्यायाधीश यांच्या अध्यक्षतेखालील तीन न्यायमूर्तींच्या खंडपीठाने सांगितले की, मदरशांमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळावे ही चिंता असती तर मदरसा कायदा रद्द करणे हा त्यावरील उपाय नव्हता, तर विद्यार्थी दर्जेदार शिक्षणापासून वंचित राहणार नाहीत याची खबरदारी घेण्यासाठी योग्य ते निर्देश देणे हा उपाय होता.

सर्वोच्च न्यायालयाने कायदा घटनात्मक असल्याचा निर्वाळा दिला असला तरी फाजिल, कामिल सारख्या पदव्या देण्याचा अधिकार हा यूजीसी (विद्यापीठ अनुदान) कायद्याच्या विरोधात असल्याचे म्हटले आहे. पदवी प्रदान करण्याचा अधिकारी वैध नाही, बाकी कायदा घटनात्मक आहे, असे सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठाने म्हटले.

# पोलीस महासंचालकपदी संजय वर्मा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



मुंबई : महाराष्ट्रामध्ये विधानसभा निवडणुकांचे बिगुल वाजले आहे. उमेदवारी अर्ज मागे घेण्याची तारीख देखील संपलीये. अनेक ठिकाणी बंडखोरी देखील बघायला मिळतंय. एकंदरीतच काय तर राज्यात निवडणुकीचे वारे वाहू लागले आहे. आता राज्यातील निवडणुकीदरम्यानच केंद्रीय निवडणूक आयोगाकडून आयपीएस संजय वर्मा यांची नवीन डीजीपी म्हणून नियुक्ती करण्यात आलीये. संजय वर्मा यांची नियुक्ती ही रश्मी शुक्ला यांच्या जागी करण्यात आलीये. गेल्या काही दिवसांपासून रश्मी शुक्ला यांच्या बदलीची मागणी ही विरोधकांकडून सातत्याने केली जात होती. यादरम्यानच केंद्रीय निवडणूक आयोगाकडून रश्मी शुक्ला यांची बदली करण्यात आली. रश्मी शुक्ला यांच्या बदलीचे आदेश केंद्रीय निवडणूक आयोगाकडून देण्यात आले. महाराष्ट्राच्या पोलीस महासंचालकपदी आता संजय वर्मा यांची बदली झाली. संजय वर्मा हे मूळ उत्तर प्रदेशचे आहेत. बीई मेकॅनिकलपर्यंत त्यांचे शिक्षण झाले. संजय कुमार वर्मा यांचा जन्म २३ एप्रिल १९६८ रोजी झाला. काँग्रेस आणि शिवसेनेकडून सातत्याने रश्मी शुक्ला यांना हटवण्याची मागणी ही केली जात होती. शेवटी केंद्रीय निवडणूक आयोगाने रश्मी शुक्ला यांच्या बदलीचे आदेश काढले. रश्मी शुक्ला यांच्यावर विरोधकांकडून काही गंभीर आरोप हे करण्यात आले. रश्मी शुक्ला यांच्या बदलीच्या अगोदर आयोगाकडून राज्याच्या मुख्य सचिव सुजाता सैनिक यांच्याकडून तीन वरिष्ठ अधिकाऱ्यांची नावे मागवण्यात आली होती. नेते आणि मंत्र्यांचे फोन टॅपिंगचे आरोपही रश्मी शुक्ला यांच्यावर झाली आहेत. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी रश्मी शुक्ला यांच्या बदलीची मागणी केली होती.




# कार्तिकी यात्रेनिमित्त श्री विठ्ठल रूक्मिणीमातेचे २४ तास दर्शन सुरू

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर /प्रतिनिधी : कार्तिकी यात्रा दरवर्षी प्रबोधिनी शुध्द एकादशी या दिवशी भरते. सन २०२४ यावर्षी कार्तिकी यात्रा दिनांक १२ नोव्हेंबर रोजी आहे. या यात्रेचा कालावधी दि.०२ ते १५ नोव्हेंबर असा राहणार आहे. या यात्रेला भाविकांची मोठ्या प्रमाणात गर्दी असते. दरवर्षी कार्तिकी यात्रेला भाविकांची होणारी गर्दी लक्षात घेता, यात्रा कालावधीत चांगला मुहुर्त व दिवस पाहून श्रींचा पलंग काढून भाविकांना २४ तास दर्शन उपलब्ध करून देण्यात येते.

दिनांक ०४ नोव्हेंबर रोजी चांगला दिवस असल्याने विधिवत पुजा करून सकाळी ७.३० वाजता श्रींचा पलंग काढण्यात आला असून, विठ्ठलाच्या मूर्तीच्या पाठीशी लोड व रुक्मिणी मातेच्या मूर्तीच्या पाठीशी तक्क्या देण्यात आला आहे. त्यामुळे श्री विठ्ठल रुक्मिणीमातेचे २४ तास मुखदर्शन, तर २२.१५ तास पदस्पर्श दर्शन सुरू राहणार असल्याचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी सांगीतले.



### कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांची माहिती

यावेळी मंदिर समितीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर, सदस्य ह.भ.प.ज्ञानेश्वर देशमुख जळगांवकर, कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, व्यवस्थापक मनोज श्रोत्री, लेखा अधिकारी मुकेश अनेचा, विभाग प्रमुख संजय कोकीळ उपस्थित होते.

श्रींचा पलंग काढण्यात आल्याने काकडा आरती, पोशाख, धुपारती, शेजारती इ. राजोपचार बंद होवून पहाटे ४.०० ते ५.०० या वेळेत नित्यपुजा, सकाळी १०.४५ ते ११.१५ पर्यंत महानैवेद्य व रात्री ८.३० ते ९.०० या वेळेत लिंबूपाणी / गंधाक्षता हे राजोपचार सुरू ठेवण्यात येत आहेत. दिनांक ०४ ते २० नोव्हेंबर (प्रक्षाळपुजा) पर्यंत २४ तास दर्शन उपलब्ध राहील. कार्तिकी यात्रेला सुरवात झाली असून, भाविकांची दर्शनरांगेत गर्दी वाढत आहे. परंपरेनुसार २४ तास दर्शन सुरू करण्यात आल्याने जास्तीत जास्त भाविकांना श्री विठ्ठल रूक्मिणीमातेचे दर्शन होणार असल्याचे व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी सांगीतले.

## संपादकीय....

### सर्वोच्च न्यायालयाचा निर्वाळा

सर्वोच्च न्यायालयाने आज वैयक्तिक मालमत्तेबाबत महत्त्वाचा निर्णय सुनावला आहे. या प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने निर्णय देताना म्हटलंय की प्रत्येक व्यक्तीची प्रत्येक संपत्ती समाजासाठी उपयुक्त मालमत्तेचे संसाधन असेलच असं नाही. म्हणजे, प्रत्येक व्यक्तीची प्रत्येक मालमत्ता समाजासाठी वापरता येईलच असं नाही. सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश डी. वाय. चंद्रचूड यांच्या अध्यक्षतेखाली नऊ न्यायाधीशांनी हा निर्णय सुनावला. स्वतःच्या कमाईची खासगी मालमत्ता संविधानाच्या अनुच्छेद ३९ (बी) अंतर्गत समाजासाठी उपयुक्त मालमत्ता मानली जाऊ शकत नाही, असं या घटनापीठाने आज निर्णय दिला. घटनापीठाने तीन भागातील हा निर्णय सुनावताना म्हटलंय की, काही खासगी मालमत्ता समाजासाठी उपयुक्त संपत्ती असू शकते, पण प्रत्येक खासगी मालमत्ता समाजासाठी उपयुक्त संसाधन असू शकत नाही. दरम्यान 'उत्तर प्रदेश मदरसा शिक्षण मंडळ कायदा, २००४' रद्द ठरवण्यास सर्वोच्च न्यायालयाने नकार देत या कायद्याची घटनात्मक तरतूद कायम असल्याचा निर्वाळा दिला. यामुळे मार्च महिन्यात अलाहाबाद उच्च न्यायालयाने दिलेल्या निकालाला अखेर स्थगिती मिळाली आहे. या कायद्यामुळे धर्मनिरपेक्ष तत्त्वाला तडा जात असल्याचे सांगून हा कायदा रद्द करण्याचा निर्णय उच्च न्यायालयाने दिला होता. त्यानंतर सर्वोच्च न्यायालयात हे प्रकरण गेले असता एप्रिल महिन्यात सर्वोच्च न्यायालयाने उच्च न्यायालयाच्या निकालाला अंतरिम स्थगिती दिली होती. यामुळे उत्तर प्रदेशमध्ये मदरशात शिक्षण घेणाऱ्या लाखो विद्यार्थ्यांना दिलासा मिळाला आहे. मार्च महिन्यात उच्च न्यायालयाने सदर कायद्याला स्थगिती देऊन मदरशात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना इतर शाळांमध्ये दाखल होण्याचे आदेश दिले होते. त्यानंतर या निर्णयाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले गेले. 'उत्तर प्रदेश मदरसा शिक्षण मंडळ कायद्यामुळे एनसीईआरटीच्या अभ्यासक्रमासह धार्मिक शिक्षण देण्याचीही तरतूद आहे. या कायद्यानुसार मदरसा शिक्षण मंडळावर मुस्लीम सदस्यांची नियुक्ती केली जाते. कायद्याच्या कलम ९ मध्ये मंडळाचे काम कसे चालणार? याबाबत दिशानिर्देशन केले गेले आहे.

# सावधान....! भारतीय लोकशाहीत पेड न्यूजला थारा नाही!

विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ ची रणधुमाळी सुरू झाली आहे. त्या पार्श्वभूमीवर भारतीय निवडणूक आयोगाने दि.१५ ऑक्टोबर २०२४ रोजी संपूर्ण राज्यात व ठाणे जिल्ह्यातही आदर्श आचारसंहिता लागू केली आहे. विधानरसभेत योग्य, कार्यक्षम व लोकाभिमुख दृष्टिकोन असलेला लोकप्रतिनिधी निवडून देण्यासाठी प्रत्येक मतदाराने मतदान करावे, असे आवाहन प्रशासनाकडून वारंवार करण्यात येते. मतदान करणे, हे राष्ट्रीय कर्तव्य असल्याने मतदारांनी कुठल्याही आमिषाला वा प्रलोभनाला बळी पडू नये. तसेच धाक दपटशाहीला भीक न घालता मतदारांनी सद्सद्विवेकबुद्धीने मतदान करावे. महत्वाचे म्हणजे निवडणुका या मुक्त, निर्भय व शांततामय वातावरणात पार पडाव्यात, यासाठी सर्वपक्षीय उमेदवारांनी अन् प्रसारमाध्यमांनी सहकार्य करावे, असे आवाहन निवडणूक आयोगाकडून करण्यात आले आहे.

मागील काही सार्वत्रिक निवडणुकींचे सिंहावलोकन केल्यावर देशात काही ठिकाणी पेड न्यूजच्या घटना घडल्याचे निदर्शनास आले आहे. खरेतर, अशा घटना लोकशाहीला मारक आहेत. त्याचप्रमाणे पेड न्यूज हे मुक्त व शोध पत्रकारितेलाही बाधक आहे. यास्तव वृत्तपत्रे अन् त्यांच्या प्रतिनिधींनी पेड न्यूज ला अजिबात थारा देऊ नये. सर्वात महत्वाचे म्हणजे सुदृढ लोकशाहीसाठी उमेदवारांनी देखील आपल्या प्रचार मोहिमेदरम्यान पेड न्यूजचा आधार घेवू नये. कारण पेड न्यूज हा लोकशाही संवर्धनाच्या मार्गातील मोठा अडसर आहे, हे लक्षात द्यावे.

प्रेस कौन्सिल ऑफ इंडियाने पेड न्यूज संदर्भात केलेली व्याख्या एखाद्या उमेदवाराने पैशाच्या मोबदल्यात किंवा विशेष मेहरनजरेच्या बदल्यात प्रसिद्धी माध्यमाद्वारे केलेली बातमी, वृत्तांकन, विश्लेषण वा प्रसारण अशी आहे. असे कृत्य केल्याचे निष्पन्न झाल्यावर त्यासंबंधीत प्रसारमाध्यम, वृत्तपत्र आणि उमेदवाराच्या लोकप्रियतेला तडा जावून जनमानसातील विश्वासाहर्ता नाहीशी होत असते. म्हणजेच एखाद्या उमेदवाराने, राजकीय पक्षाने वा त्याच्या संघटना किंवा संस्थेने मतदारांना प्रभावित करण्याच्या हेतूने वर्तमानपत्रे, सोशल मीडिया, इलेक्ट्रॉनिक मीडिया (विभिन्न चॅनल्स) यांच्याद्वारे सोयीनुसार बातम्या प्रसिद्ध-प्रसारित करणे, हे सर्वप्रकारे पेड न्यूजच्या कक्षेत येतात, हे उमेदवार व माध्यमांनी जरूर लक्षात घ्यावे.

सांगण्याचे तात्पर्य म्हणजे वृत्तांकनाच्या (दृकश्राव्य) बदल्यात घेतलेला पैसा वा भेटवस्तू याला भ्रष्टाचाराचे कृत्य म्हणून घोषित केल्याने, तो आता शिक्षापात्र अपराध आहे. म्हणूनच पेड न्यूजसारख्या गैरप्रकारांना प्रसारमाध्यमांनी स्वतःहूनच मज्जाव करावा, असे आवाहन करण्यात येत आहे.

उमेदवारांनी प्रचार मोहिमेत केलेल्या खर्चाचा अचूक लेखा ठेवून, त्याचे विवरणपत्र संबंधित निवडणूक अधिकाऱ्यांकडे तसेच खर्च नियंत्रण समितीच्या नोडल अधिकाऱ्यांकडे सादर करणे, निवडणूक आयोगाने अनिवार्य केले आहे. त्यात कसूर करणे हाही एक अपराधच आहे, याची संबंधितांनी नोंद द्यावी.

पत्रकारिता हा लोकशाहीचा चौथा स्तंभ आहे तर पेड न्यूज हा निकोप पत्रकारितेची संभाव्य कीड आहे. यासाठी पत्रकारांनीच पुढाकार घेवून पेड न्यूज या अनैतिक बाबीला अस्वीकृत करून हद्दपार करायला हवे. वृत्तपत्रे व दूरचित्र वाहिन्यांनी पत्रकारितेची मूल्ये शिरसावंद्य मानून, लोकशाहीची बूज राखायला हवी. प्रसारमाध्यमांचे प्रतिनिधी हे लोकशाहीचे पाईक असल्याने, त्यांनी पत्रकारिता क्षेत्रातून पेड न्यूजला हद्दपार करण्यास कटिबद्ध व्हावे. घटनाकार भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर लिखित राज्यघटना अन् भारतीय लोकशाहीचा जगाच्या पाठीवर सर्वत्र नावलौकिक आहे. या पार्श्वभूमीवर विधानसभेतील सर्वपक्षीय उमेदवार, त्यांचे पदाधिकारी आणि प्रसारमाध्यमे (प्रिंट व इलेक्ट्रॉनिक माध्यमे) या सर्वांनी योग्य ती खबरदारी घेवून लोकशाहीला मारक असलेल्या पेड न्यूजचा मार्ग अवलंबू नये, असे आवाहन करण्यात येत आहे. आपण अशा प्रकारे कर्तव्यपूर्ती केल्यामुळे भारतीय लोकशाही जागतिक स्तरावर सदैव आदर्श लोकशाही म्हणून गणली जाईल, हे निश्चित!

**मनोज सुमन शिवाजी सानप**
जिल्हा माहिती अधिकारी, ठाणे
तथा नोडल अधिकारी, एकत्रित मीडिया कक्ष आणि
सदस्य सचिव माध्यम प्रमाणिकरण व सनियंत्रण समिती, ठाणे

# स्वेरीमध्ये एक दिवशीय 'इल्युमिनेट वर्कशॉप'




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर- गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील श्री. विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूट संचलित स्वेरीज कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगमध्ये 'इल्युमिनेट वर्कशॉप' (उद्योजकतेवर आधारित कार्यशाळा) चे आयोजन केले होते. या कार्यशाळेस विद्यार्थ्यांकडून प्रचंड प्रतिसाद मिळाला. या कार्यशाळेच्या माध्यमातून करिअर बाबत योग्य दिशा मिळाल्याने आपले करिअर उज्वल करण्यासाठी विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढला.

'स्वेरीज् इ- सेल स्टुडन्ट टीम' आणि 'आयआयटी बॉम्बे इ-सेल' यांच्या संयुक्त विद्यमाने स्वेरीच्या इंटरनॅशनल कॉन्फरन्स हॉल मध्ये ही एक दिवसीय कार्यशाळा संपन्न झाली. या कार्यशाळेसाठी आयआयटी बॉम्बेच्या इ-सेल कडुन उद्योजिका दीप्ती नथाला हया मार्गदर्शक म्हणून लाभल्या. दीप्ती नथाला हया आयआयटी मद्रासच्या पदवीधर असून त्यांचे स्वतःचे दोन स्टार्टअप आहेत. 'शार्क टँक इंडिया' या टेलिव्हिजन शोमध्ये त्यांनी उत्तम रीत्या सादरीकरण केले होते. त्यांनी स्वेरीतील विद्यार्थ्यांना 'उद्योजकतेवर' बहुमोल मार्गदर्शन केले. या कार्यशाळेसाठी १२० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. नथाला यांनी आंत्रप्रन्युअरशिप माईंडसेट, उद्योजकतेमध्ये करिअर करताना आपली मानसिकता कशी असावी ? तसेच बिजनेस मॉडेल कॅनव्हास यासंबंधी बहुमोल मार्गदर्शन केले. यावेळी विद्यार्थ्यांकडून विविध प्रकारच्या ॲक्टिव्हिटी करून घेण्यात आल्या. या कार्यशाळेचे आयोजन स्वेरीच्या स्टुडंट इ-सेल टीमने 'नॅशनल आंत्रप्रन्युअरशिप चॅलेंज-२०२४' अंतर्गत उत्तम रीत्या केले. या कार्यशाळेतून स्वेरीतील विद्यार्थ्यांना 'इव्हेंट ऑर्गनायझेशन'चा देखील अनुभव मिळाला. स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरींगचे प्राचार्य डॉ.बी.पी. रोंगे यांच्या कुशल व नियोजन बद्ध मार्गदर्शनाखाली स्वेरीमध्ये असे विविध उपक्रम राबवले जातात. यामुळे विद्यार्थ्यांमधील आत्मविश्वास वाढीस लागतो व संशोधनाकडे त्यांचा कल अधिक राहतो. यामुळे साहजिकच विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्त्व विकास होऊन चांगले करिअर करण्यासाठी हातभार लागतो. सातत्याने होत असलेल्या अशा संशोधनात्मक कार्यशाळांमुळे विद्यार्थ्यांना एक प्रकारची प्रेरणा मिळते. या कार्यशाळेच्या यशस्वीतेसाठी विद्यार्थीनी प्रतिनिधी समिक्षा खटावकर तसेच इ-सेल टिम मधील विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले. या कार्यशाळेत डॉ. हर्षवर्धन रोंगे यांनी देखील मार्गदर्शन केले. या कार्यशाळेला पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूरच्या विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. पी. एम. पवार, स्वेरीचे अधिष्ठाता, प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

# केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी केली प्रकाश आंबेडकर यांच्या प्रकृतीची चौकशी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**





मुंबई /प्रतिनिधी : रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना रामदास आठवले यांनी आज वंचित बहुजन आघाडी चे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांच्या प्रकृतीची दूरध्वनीद्वारे चौकशी केली.प्रकाश आंबेडकर यांना पुण्यातील रुग्णालयातुन डिस्चार्ज देण्यात आला आहे.आता त्यांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती त्यांच्या पत्नी अंजलिताई प्रकाश आंबेडकर यांनी ना.रामदास आठवले यांना दिली.पुण्यात जाऊन लवकरच आपण प्रकाश आंबेडकर यांची भेट घेणार असल्याचे ना.रामदास आठवले यांनी अंजलीताई आंबेडकर यांना. सांगितले.

महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे नातू आणि आंबेडकरी चळवळीचे ज्येष्ठ नेते ॲड.प्रकाश आंबेडकर यांची प्रकृती अस्वस्थ असल्याने त्यांना रुग्णालयात दाखल केल्याची माहिती मिळाल्यानंतर ना. रामदास आठवले यांनी अत्यंत काळजीने प्रकाश आंबेडकर यांच्या प्रकृतीची चौकशी दूरध्वनी द्वारे केली.आता अँड.प्रकाश आंबेडकर यांची प्रकृती स्थिर आहे.त्यांची अँजीयोप्लास्टी करण्यात आली असून आता त्यांची प्रकृती चांगली आहे ॲड. प्रकाश आंबेडकर यांची प्रकृती लवकर चांगली व्हावी अशा शुभेच्छा देऊन लवकरच पुण्यातील निवासस्थानी आपण ॲड. प्रकाश आंबेडकर यांची भेट घेणार असल्याचे ना.रामदास आठवले यांनी सांगितले.

# शाखा कार्यकारिणी वर्धापन दिन व वर्षावास सांगता कार्यक्रम मोठ्या उत्साहात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



भिवंडी प्रतिनिधी/मिलिंद जाधव : भारतीय बौध्द महासभा भिवंडी तालुका महिला व पुरुष कार्यकारिणीच्या वतीने भारतीय बौध्द महासभा भिवंडी तालुका महिला शाखा कार्यकारिणी प्रथम वर्धापन दिन आणि वर्षावास सांगता कार्यक्रम भिवंडी तालुक्यातील पंचशील बुद्धविहार अर्जुनली येथे मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी प्रमुख मार्गदर्शन म्हणून भारतीय बौध्द महासभा केंद्रीय प्रशिक्षण उपविभाग प्रमुख सुप्रियाताई कासारे , ठाणे जिल्हा भारतीय बौद्ध महासभा महिला शाखा अध्यक्षा शीलाताई तायडे यांनी मार्गदर्शन केले.

धम्मचळवळ अधिक गतिमान करण्यासाठी सर्वप्रथम उच्चशिक्षण घेऊन तरुण पिढीने धम्म चळवळीत सहभागी व्हायला हवे असे प्रतिपादन सुप्रियाताई कासारे यांनी केले. भिवंडी तालुका शाखेने वर्षावास काळात आषाढ पौर्णिमा ते आश्विन पौर्णिमा काळात तीन महिने प्रवचन मालिका नियोजनबद्ध अनेक गावांमध्ये उत्तम रित्या राबविली त्याबद्दल देखील तालुका शाखेचे अभिनंदन केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रंजनाताई भोईर होत्या. तर स्वागताध्यक्ष म्हणून रोहित जाधव होते. यावेळी भारतीय बौद्ध महासभाजिल्हा शाखेच्या संरक्षण सचिव सुशिलाताई गायकवाड , जिल्हा संघटक अशोक जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती. तालुका महिला शाखेच्या प्रचार पर्यटन उपाध्यक्षा बारकुबाई गायकवाड, प्रचार-प्रसार व पर्यटन सचिव नीता गायकवाड आणि रेणुका पवार, संरक्षण सचिव प्राची लोकरे आणि आश्विनीताई चन्ने, हिशोब तपासनीस रीना जाधव, संघटक रजनीताई गायकवाड आणि भारतीय बौद्ध महासभा भिवंडी तालुका शाखेचे प्रचार-प्रसार व पर्यटन उपाध्यक्ष अजय गायकवाड, संस्कार सचिव धार्मिक गायकवाड , संघटक शंकर कांबळे उपस्थित होते.

तसेच भारतीय बौद्ध महासभा भिवंडी तालुका माजी अध्यक्ष दिलीप जाधव आणि माजी सरचिटणीस प्रमोद गायकवाड, केंद्रिय केंद्रीय शिक्षिका सरिताताई भोईर, धम्मप्रचारक विनायक जाधव , ज्येष्ठ बौद्धाचार्य संजय जाधव , वंचित बहुजन आघाडीचे ज्येष्ठ कार्यकर्ते डी .एस गायकवाड आणि भाईदास जाधव, सचिन जाधव, भिमराज गायकवाड, सुरेंद्र जाधव तसेच ग्रामशाखा पदाधिकारी तर आदी उपस्थित होते. यावेळी अर्जुनली ग्राम शाखा अध्यक्ष स्वप्निल जाधव व संपूर्ण कार्यकारिणी यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भारतीय बौद्ध महासभा भिवंडी तालुका सरचिटणीस ड. श्वेता भालेराव ,संदीप जाधव यांनी केले व आभार प्रदर्शन चेतना गायकवाड यांनी केले.

## पिराची कुरोली, देवडे, खेडभोसे, शेवते, तरटगाव आणि पटवर्धन कुरोली येथे सभा

**अभिजीत पाटील**

# माढ्यात विद्यमान आमदारांनी दहशतीचे राजकारण केले

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



पंढरपूर/प्रतिनिधी : माढा विधानसभा मतदारसंघातील महाविकास आघाडी, राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाचे अधिकृत उमेदवार अभिजीत पाटील यांची रविवारी मतदार संघातील पिराची कुरोली, देवडे, खेडभोसे, शेवते, तरटगाव आणि पटवर्धन कुरोली येथे सभा पार पडली.

यावेळी हजारो नागरिकांच्या उपस्थितीत हलगीच्या कडकडाटासह फटाक्याच्या आतिषबाजी करत मोठ्या उत्साहात अभिजीत पाटील यांचे स्वागत करण्यात आले. या सभेस संबोधित करताना अनेक वकत्यांनी बोलतांना सांगितले की शेतकऱ्यांचे हित डोळ्यासमोर ठेवून शेतकऱ्यांच्या आर्थिक उन्नतीसाठी काम करणारा महाराष्ट्रातील ऐकमेव नेता म्हणजे अभिजीत आबा पाटील आहेत.

कोरोना महामारीच्या संकटात त्यांनी त्यांचे आर्थिक नुकसान करून ऑक्सिजन प्लांट तयार केला होते, डीव्हीपी मॉल बंद करून कोविड हॉस्पिटल चालू केले होते. यामुळे त्यांना माणसातील देवमाणुस म्हणून ओळखले जाते असे उद्गार अनेकांनी यावेळी काढले.


पंढरपूर तालुक्यातील पटवर्धन कुरोली येथील सभेत अभिजीत पाटील यांनी नागरिकांशी संवाद साधताना म्हणाले की; विद्यमान आमदारांनी माढ्यात कोणताही विकास केला नाही. महापुरुषांचे पुतळे ही उभा करू शकले नाहीत. शेतकऱ्यांच्या ऊसाला दर दिला नाही. करकंब मध्ये नगरपरिषद होऊ दिली नाही. माढ्याला पिण्याचे पाणी सुद्धा ते देऊ शकले नाहीत. यामुळे येथील जनता त्रस्त झाली आहे.

ते पुढे बोलताना म्हणाले की, सत्ताधारी म्हणतात की आम्ही विकास केला. मात्र इथले हजारो तरुण बेरोजगार कसे असा प्रश्न उपस्थित करत या सर्व समस्या सोडवायच्या असतील तर मला संधी द्या. एमआयडीसीचा प्रश्न एका वर्षात पूर्ण करून दाखवतो. या माध्यमातून या भागातील वीस हजार तरुणांच्या हाताला काम देण्याची भूमिका पार पाडेन. मी आमदार झाल्यानंतर विधानसभेतील पहिल्या भाषणांत मराठा आरक्षण या विषयी प्रश्न उपस्थित करीन असा विश्वास त्यांनी यावेळी उपस्थित नागरिकांना दिला.

यावेळी अभिजीत पाटील यांना देवडे येथील मराठा उपोषणकर्ते संतोष झांबरे, जिजाबा तुकाराम पाटील, कल्याण काळे गटाचे शरद शिंदे, परिचारक गटाचे ज्ञानेश्वर गंगाधर बनसोडे, नांदोरे येथील मोतीलाल आप्पा भिंगारे, तरटगावचे परिचारक गटाचे भारत कांबळे, नांदोरे येथील परिचारक गटाचे रविकांत माने या सर्वांनी अभिजीत पाटील यांना आमदार करण्यासाठी आपल्या सहकार्यांने सोबत त्यांच्या गटात प्रवेश करून पाठिंबा दिला. दिवसेंदिवस अभिजीत पाटील यांना माढा मतदारसंघातून तसेच मतदार संघातील माळशिरस आणि पंढरपूर तालुक्यातील ४२ गावांमधून वाढता पाठिंबा मिळताना दिसत आहे. त्यांच्या सभांना नागरिक रेकॉर्ड ब्रेक गर्दी करत आहेत. यामुळे अभिजीत पाटील यांचा जवळपास विजय निश्चित मानला जात आहे.

# भाजपा व महायुतीचे उमेदवार आमदार समाधान आवताडे यांच्या प्रचारार्थ विविध गावांमध्ये प्रचार दौरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर मंगळवेढा विधानसभा मतदारसंघासाठी भारतीय जनता पार्टी व महायुतीचे अधिकृत उमेदवार आमदार समाधान महादेव आवताडे यांच्या निवडणूक प्रचाराच्या अनुषंगाने एवढा तालुक्यातील खालील गावांमध्ये प्रचार दौरा आयोजित करण्यात आला असल्याची माहिती माहिती जनसंपर्क कार्यालय यांच्या वतीने देण्यात आली आहे.

सकाळी ८.३० वाजता हिवरगांव, ९.३० वाजता खोमनाळ, १०.१५ वाजता भाळवणी, ११.१५वाजता निंबोणी, १२.१५ वाजता चिक्कलगी, १.०० वाजता मारोळी, दुपारी ३.००वाजता शिरनांदगी, ३.४५ वाजता सिद्धनकेरी, ४.३० वाजता जालिहाळ, सायं.५.१५ वाजता हाजापूर, ६.०० वाजता डोंगरगाव, सायं.७.००वाजता रड्डे असा हा प्रचार दौरा संपन्न होणार आहे. आमदार समाधान आवताडे गेल्या तीन वर्षांपासून मतदारसंघात केलेल्या विविध विकास कामांची दखल घेऊन भारतीय जनता पार्टीने या विधानसभा मतदारसंघांमध्ये आमदार समाधान आवताडे यांची भाजपा व महायुतीचे उमेदवारी घोषित केली आहे. रस्ते,वीज,आरोग्य,शिक्षण इत्यादी मूलभूत आणि पायाभूत विकास बाबींमध्ये त्यांनी केलेले भरीव कार्य त्यांना या निवडणुकीत प्लस पॉईंट ठरणार आहे. तरी वरील दौऱ्यासाठी संबंधित गावातील भाजपा महायुतीचे पदाधिकारी कार्यकर्ते आणि ग्रामपंचायत पदाधिकारी व ग्रामस्थांनी बहुसंख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

## थोडक्यात...

### अज्ञात इसमाने जबरदस्तीने खिशातील मोबाईल पळवला

सोलापूर (प्रतिनिधी) भारत माता नगर येथील विशाल किराणा दुकानासमोर फिर्यादी आंदानेप्पा आबा आंटद (वय-७२,रा. भारत माता नगर) येथे उभारलेले असताना अज्ञात इसमाने फिर्यादी यांच्या खिशातील मोबाईल जबरदस्तीने काढून घेऊन पळून गेला आहे.ही घटना ३ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वाजण्याच्या दरम्यान घडली.या प्रकरणी आंटद यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून,त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात इसमाविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल पाटील हे करीत आहेत.

### सिव्हिल हॉस्पिटल येथून दुचाकी पळवली

सोलापूर (प्रतिनिधी) सिव्हिल हॉस्पिटल जवळ पार्क करून ठेवलेली दुचाकी क्रमांक एमएच.१३.सीवाय.८२४९ ही अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना २२ ऑक्टोंबर रोजी घडली.इलाही मकबुल शेख (वय-४४,रा.नीलम नगर) यांनी सदर बझार पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल फुटाणे हे करीत आहेत.

### कुलकर्णी तांडा येथील घरातून सोन्याचे दागिने लंपास

सोलापूर (प्रतिनिधी) कुलकर्णी तांडा येथील फिर्यादी जयश्री मारुती चव्हाण (वय-४०,रा.मु.पो.कुलकर्णी तांडा) यांच्या उघड्या घरात अज्ञात चोरट्याने प्रवेश करून लोखंडी कपाट उचकटून त्यामधील ९४ हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने चोरून नेल्याची घटना ३ नोव्हेंबर रोजी दुपारी एक ते सहा वाजण्याच्या दरम्यान घडली.याप्रकरणी जयश्री चव्हाण यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून,त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.पुढील तपास पोलीस करीत आहेत.

### बस मध्ये चढताना दोन महिलांचे सोन्याचे दागिने पळवले

सोलापूर (प्रतिनिधी) सोलापूर एसटी स्टँड येथे फिर्यादी आसमा आयाज पठाण (वय-२४,रा.मु.पो.कनगरा टाकळी, जिल्हा धाराशिव) या सोलापूर ते मंगळवेढा जाणाऱ्या बस मध्ये चढत असताना व तसेच दिपाली सतीश मोकाशी या सोलापूर ते विजयपूर जाणाऱ्या बस मध्ये चढताना दोघींच्या पर्समधील एकूण २ लाख ३२ हजार २०० रुपयांचे सोन्याचे दागिने अज्ञात चोरट्याने मुद्दामून लबाडीने चोरून नेले आहे. ही घटना ४ नोव्हेंबर रोजी दुपारी साडेतीन ते संध्याकाळी सहा वाजण्याच्या दरम्यान सोलापूर एसटी स्टँड येथे घडली.याप्रकरणी आसमा पठाण यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून,त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक धायगुडे हे करीत आहेत.

# माझ्यापेक्षा दुप्पट मताधिक्याने अभिजीत पाटील विजयी होतील : धैर्यशील मोहिते-पाटील

## रांझणी (भिमानगर) येथे विजयसिंह मोहिते-पाटील यांच्या हस्ते प्रचाराचा नारळ फोडून प्रचाराचा केला शुभारंभ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : महाविकास आघाडी माढा मतदारसंघातील राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाचे उमेदवार अभिजीत पाटील यांच्या प्रचाराचा शुभारंभ काल रांझणी भिमानगर ता. माढा येथून महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमोत्री विजयसिंह मोहिते-पाटील यांच्या हस्ते नारळ फोडून करण्यात आला.



यावेळी खा.धैर्यशील मोहिते-पाटील म्हणाले की; विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचा सभासद हा कैलासवासी औदुंबर आण्णा पाटील आणि शरदचंद्र पवार यांच्या विचारांच्या पाठीशी कायम उभा राहिलेला आहे त्याच विचारांवर अभिजीत पाटील यांच्यासोबत देखील उभा राहील असा ठाम विश्वास आहे.लोकसभेला जेवढे लिड मला दिले आहे त्यापेक्षा डबल मतांनी अभिजीत पाटील यांना निवडून देण्याचे आश्वासन यावेळी बोलताना दिले.

यावेळी बोलताना शिवतेजसिंह मोहिते-पाटील म्हणाले की,विजयदादा व रणजितसिंह मोहिते-पाटील यांनी रस्त्यांसाठी कोट्यवधी रुपयांचा निधी आणला. मात्र प्रस्थापित लोकप्रतिनिधींनी त्यात आडफाटा आणण्याचे काम केल्याची टीका त्यांनी आमदार बबनराव शिंदे यांचे नाव न घेता त्यांच्यावर केली. त्याचबरोबर अभिजीत पाटील यांना मोठ्या दादांनी आशीर्वाद दिला असल्याने त्यांचा विजय निश्चित असून तरीही कार्यकर्त्यांनी गाफील न राहण्याचे आवाहन त्यांनी केले.

यानंतर अभिजीत पाटील यांनी बोलताना सांगितले की; भीमा नदी पट्ट्यातील अनेक भागात केळी उत्पन्न जास्त असून यासाठी केळी संशोधन केंद्र उभारण्यासाठी प्रयत्न करणार आहे. त्याचबरोबर ही केळी परदेशात निर्यात व्हावी यासाठीही पुरेपूर पाठपुरावा करणार असून ड्रायफूड निर्मिती प्रक्रियेसही प्राधान्य देणार आहे. यामुळे केळी, डाळिंब, द्राक्षे यांना भरघोस आणि उत्तम असा दर मिळेल. महाराष्ट्रातील सर्वात मोठे उजनी धरण सोलापूर जिल्ह्यात असूनही पाण्याचे योग्य नियोजन या लोकप्रतिनिधींनी कधीच केले नसल्यामुळे हे धरण मायनस मध्ये जाते. त्यामुळे शेतकऱ्यांना त्रास सहन करावा लागतो. त्याचबरोबर नदीवरील बंधाऱ्याची उंची कमी असल्यामुळे पावसाळ्यात लाखो लिटर पाणी वाया जाते. हे पाणी आपल्याला बंधाऱ्याची उंची वाढवल्यास वापरता येईल. याकरता योग्य नियोजनाची गरज असल्याचाही त्यांनी नमूद केले. माढा व पंढरपूर तालुक्यात रोजगार निर्मितीचा प्रश्न गंभीर असून यासाठी एमआयडीसी उभारण्याची गरज आहे. एम आयडीसीसाठी शेकडो एकर जमीन असतानाही स्थानिक लोकप्रतिनिधी जाणीवपूर्वक लोकांना गंडवत आहेत. यामुळे हजारो लोकांचा रोजगार बुडत असून आपल्याला निवडून दिल्यास एक वर्षाच्या आत एमआयडीसीचा प्रश्न सोडवू असे आश्वासन त्यांनी दिले. सोबतच उजनी धरणावर पर्यटन स्थळ निर्माण करून स्थानिक लोकांना रोजगार उपलब्ध करून देण्याचा शब्दही त्यांनी दिला. त्याचबरोबर उपसा सिंचन योजनेस कोणताही धक्का लागणार नाही असे आश्वासनही त्यांनी यावेळी दिले.

### विठ्ठल कारखान्याचा सभासद हा औदुंबर आण्णा आणि शरद पवार यांच्याच विचाराच्या पाठीशी कायम उभा आहे : खासदार धैर्यशील मोहिते-पाटील

याप्रसंगी राज्याचे माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील, खासदार धैर्यशील मोहिते-पाटील, शिवतेजसिंह मोहिते पाटील शिवसेना (उबाठा) साईनाथ भाऊ अभंगराव, संभाजीराजे शिंदे, धनंजय डिकोळे, भारत नाना पाटील बाळासाहेब पाटील, बाळासाहेब तात्या ढवळे, दिनेश जगदाळे, रावसाहेब नाना देशमुख, बाबूतात्या सुरवसे, काकासाहेब पाटील, मधुकर देशमुख, पोपट तात्या अनपट, सागर पडगळ, औदुंबर महाडिक, गोविंद पवार, अरुण तोडकर, सौदागर जाधव, दत्ताभाऊ ढवळे, सुरज भैय्या देशमुख, आकाश पाटील, प्रताप मिसाळ, माणिक अण्णा लांडे, प्रशांत पाटील, रविकांत पाटील, सचिन जगताप, अशोक बिचुकले, हरिभाऊ माने, सागर गिड्डे, दीपक खोचरे, ड.विजय गिड्डे, मधुकर ठोंबरे, राजाभाऊ भंगिरे, तुकाराम मस्के, सुवर्णा शिवपुरे, अनिता पवार, प्रमोदिनी लांडगे, विनिती कुलकर्णी, स्नेहा निंबाळकर, ऋतुजा सुर्वे, सुंदरताई माळी यांसह अधिक मान्यवर उपस्थित होते.

# ॲड. प्रकाश आंबेडकरांसाठी धम्मभूमी काळीमाती बुद्ध विहारात तथागत बुद्धांना वंदन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

बोंडगांव देवी/प्रतिनिधी : वंचितांचे कैवारी, आरक्षण रक्षक तथा वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ड. बाळासाहेब तथा प्रकाश आंबेडकर दि.३१ ऑक्टोंबर २०२४ रोजी यांची आरोग्य प्रकृती अस्वस्थ वाटू लागल्याने त्यांच्या छातीमध्ये दुःखायला लागतय म्हणून हि माहिती ॲड. प्रकाश आंबेडकर यांच्या ट्विटरवरून पोस्ट केले होते. त्या ट्विटरवरून सर्व सोशल मीडिया व वंचित बहुजन आघाडीचे पदाधिकारी व कार्यकर्ते यांच्या माहिती द्वारे माहिती मिळाली त्यानंतर पुणे येथील रूग्णालयात ड. प्रकाश आंबेडकर यांना दाखल करण्यात आले. त्यावेळी त्यांच्यावर पुणे येथील रूग्णालयात उपचारादरम्यान छातीमध्ये रक्ताची गुठळी आहे म्हणून डॉक्टरांकडून माहिती मिळाली असता डॉक्टरांनी जिओप्लास्टी करता येऊ शकतो आणि ती जिओप्लास्टी करून पुर्णपणे बरें होऊ शकतात अशी आशावादी माहिती पुणे येथील रूग्णालयातील डॉक्टरांनी दिली हि माहिती मिळताच सर्व ॲड. प्रकाश आंबेडकरांना मानणारा समाजवर्ग आरक्षण हा धोक्यात आलेला असून त्यासाठी वंचित, शोसितांचे आरक्षण वाचविण्याकरिता पुढे



होऊन लढणारे लढवय्य स्वाभिमानी ॲड. प्रकाश आंबेडकर यांची खालावलेली आरोग्य स्थिती हि चांगली व्हावी म्हणून दिनांक १ ऑक्टोबर रोजी अर्जुनी मोरगांव तालुक्यातील वंचित बहुजन आघाडीच्या पदाधिकारी व कार्यकर्ते यांच्याकडून अर्जुनी मोरगांव तालुक्यातील निसर्गाच्या सानिध्यात वसलेल्या धम्मभूमी काळीमाती येथील असलेल्या बुद्ध विहारातील तथागत गौतम बुद्धांच्या मुर्तीसमोर तालुक्यातील वंचित बहुजन आघाडीच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी मेणबत्ती लावून व बुद्ध वंदना आणि पुष्प अर्पण करून ॲड. प्रकाश आंबेडकरांची खालावलेली आरोग्य स्थिती हि लवकर बरी व्हावी याकरीता यावेळी शांतीचे अग्रदूत तथागत गौतम बुद्धांना वंदन करून अभिवादन करण्यात आले.

याप्रसंगी वंचित बहुजन युवा आघाडी जिल्हाध्यक्ष अश्विन डोंगरे, वंचित बहुजन युवा आघाडी अर्जुनी मोर तालुकाध्यक्ष कैलास इस्कापे, से.नि.तहसिलदार अशोक लांजेवार, सामाजिक कार्यकर्ते नितेश बोरकर, वंचित बहुजन आघाडी तालुका महासचिव संदिप नंदागवळी, वंचित बहुजन युवा आघाडी महासचिव हर्षपाल लोणारे, लोमेश सांगोडे, वंचित बहुजन युवा आघाडी तालुका प्रसिद्धी प्रमुख विश्वरत्न रामटेके, वंचित बहुजन युवा आघाडी सडक अर्जुनी तालुका उपाध्यक्ष आकाश मेश्राम, पत्रकार मुन्नाभाई नंदागवळी, स्वप्नील शेंडे, अशोक खोब्रागडे आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# कल्याणशेट्टी महाविद्यालयाच्या कार्याचे प्र. कुलगुरु डॉ प्रमोद पाटील यांच्याकडून कौतुक



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर येथील प्र कुलगुरू डॉ प्रमोद पाटील यांनी कल्याणशेट्टी महाविद्यालयास सदिच्छा भेट दिली, त्यांनी महाविद्यालयाच्या कार्याचे कौतुक केले. दीपावलीच्या सुट्टीचे औचित्य साधून डॉ प्रमोद पाटील सहकुटुंब अक्कलकोट येथे दर्शनाच्या निमित्ताने आले होते, त्यावेळी त्यांनी कल्याणशेट्टी महाविद्यालयास सदिच्छा भेट देण्याची इच्छा व्यक्त केली. महाविद्यालयाच्या वतीने त्यांचा सहकुटुंब सत्कार करण्यात आला. यावेळी ते म्हणाले की, सीमावर्ती भागातील विद्यार्थ्यांना ज्ञानदान करणे हे तसे भाषिक दृष्ट्या कठीण कार्य असते तरीसुद्धा कल्याणशेट्टी महाविद्यालयातील शिक्षक दर्जेदार पद्धतीने अध्यापनाचे काम करत आहेत. व्यवस्थापन परिषदेची त्यांना साथ मिळते ही बाब कौतुकास्पद आहे, राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्व विकासात महाविद्यालयाने दिलेले योगदान कौतुकास्पद असल्याचे त्यांनी नमूद केले. महाविद्यालयातील शिक्षक शिक्षकेतर सेवकांना त्यांनी दीपावली सणाच्या शुभेच्छा दिल्या.

संस्थेचे अध्यक्ष विद्यमान आमदार सचिन दादा कल्याणशेट्टी ज्येष्ठ संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी विद्यापीठाचे पदार्थ विज्ञान विभाग प्रमुख डॉ विकास पाटील, संचालिका शांभवीताई कल्याणशेट्टी, जुनिअर विभाग प्रमुख पूनम कोकळगी, सेमी विभाग प्रमुख रूपाली शहा, समन्वयक मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी यांनी संस्थेच्या वतीने प्र कुलगुरू डॉ प्रमोद पाटील यांना शुभेच्छा दिल्या.

## जिल्हा निवडणूक अधिकारी कुमार आशीर्वाद; एकूण ३३४ उमेदवारांनी भरला अर्ज

## १५० उमेदवारांनी निवडणुकीतून घेतली माघार

# सोलापूर जिल्ह्यातील ११ विधानसभा मतदारसंघात १८४ उमेदवार निवडणूक लढविणार


**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर (जिमाका) :- भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशाप्रमाणे दिनांक १५ ऑक्टोबर २०२४ रोजी महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ चा कार्यक्रम जाहीर झालेला आहे. त्या अनुषंगाने सोलापूर जिल्ह्यातील ११ विधानसभा मतदारसंघात दिनांक २२ ऑक्टोबर ते २९ ऑक्टोबर २०२४ या कालावधीत ३३४ उमेदवारांनी निवडणूक लढविण्यासाठी अर्ज भरलेले होते दिनांक ४ नोव्हेंबर २०२४ अखेरपर्यंत १५० उमेदवारांनी आपले उमेदवारी अर्ज माघारी घेतलेले असून १८४ उमेदवार निवडणूक लढविणार आहेत, अशी माहिती जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिली.

सोलापूर जिल्ह्यातील एकुण ११ विधानसभा मतदार संघामध्ये खालीलप्रमाणे निवडणूक लढविण्याच्या उमेदवारांची विधानसभा मतदार संघनिहाय संख्या......

२४४- करमाळा, एकुण उमेदवार ३१, अर्ज माघारी घेतलेले उमेदवार १६, एकुण निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची संख्या १५,

२४५- माढा, एकुण उमेदवार ३०, अर्ज माघारी घेतलेले उमेदवार १७, एकुण निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची संख्या १३,



२४६- बार्शी, एकुण उमेदवार ३१, अर्ज माघारी घेतलेले उमेदवार ११, एकुण निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची संख्या २०,

२४७- मोहोळ (अ.जा), एकुण उमेदवार २७, अर्ज माघारी घेतलेले उमेदवार १७, एकुण निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची संख्या १०,

२४८- सोलापूर शहर उत्तर, एकुण उमेदवार २६, अर्ज माघारी घेतलेले उमेदवार ०६, एकुण निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची संख्या २०,

२४९- सोलापूर शहर मध्य, एकुण उमेदवार ३९, अर्ज माघारी घेतलेले उमेदवार १९, एकुण निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची संख्या २०,

२५०- अक्कलकोट, एकुण उमेदवार १५, अर्ज माघारी घेतलेले उमेदवार ०३, एकुण निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची संख्या १२,

२५१- सोलापूर दक्षिण, एकुण उमेदवार ४०, अर्ज माघारी घेतलेले उमेदवार १५, एकुण निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची संख्या २५,

२५२- पंढरपूर, एकुण उमेदवार ३८, अर्ज माघारी घेतलेले उमेदवार १४, एकुण निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची संख्या २४,

२५३- सांगोला एकुण उमेदवार ३२, अर्ज माघारी घेतलेले उमेदवार १९, एकुण निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची संख्या १३,

२५४- माळशिरस (अ.जा), एकुण उमेदवार २५, अर्ज माघारी घेतलेले उमेदवार १३, एकुण निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची संख्या १२, एकुण उमेदवार ३३४, अर्ज माघारी घेतलेले उमेदवार १५०, एकुण निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची संख्या १८४.

विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ साठी मतदार संघ निहाय मतदान केंद्र व मतदार संख्या-

मतदार संघ २४४-करमाळा, एकुण मतदान केंद्रांची संख्या - ३४७, मतदार -पुरूष १ लाख ७१ हजार ५१५, महिला- १ लाख ५७ हजार ४६८, तृतीयपंथीय -११, एकुण ३ लाख २८ हजार ९९४, सैनिक मतदार-४६७, ८५ वर्षावरील मतदार- ५ हजार ७०५.

मतदार संघ २४५-माढा, एकुण मतदान केंद्रांची संख्या - ३५५, पुरूष १ लाख ८३ हजार ९४८, महिला- १ लाख ६८ हजार ७४०, तृतीयपंथीय -०३, एकुण ३ लाख ५२ हजार ६९१, सैनिक मतदार-३५५, ८५ वर्षावरील मतदार- ५ हजार १८६.

मतदार संघ २४६-बार्शी, एकुण मतदान केंद्रांची संख्या - ३३३, पुरूष १ लाख ७३ हजार ४५३, महिला- १ लाख ६४ हजार २, तृतीयपंथीय -४४, एकुण ३ लाख ३७ हजार ४९९, सैनिक मतदार-५६३, ८५ वर्षावरील मतदार- ६ हजार ८३९.

मतदार संघ २४७- मोहोळ (अ.जा), एकुण मतदान केंद्रांची संख्या - ३३६, पुरूष १ लाख ७३ हजार १२१, महिला- १ लाख ५८ हजार ३२९, तृतीयपंथीय -०८, एकुण ३ लाख ३१ हजार ४५८, सैनिक मतदार-४२४, ८५ वर्षावरील मतदार- ५ हजार १५९.

मतदार संघ २४८-सोलापूर शहर उत्तर, एकुण मतदान केंद्रांची संख्या - २८९, पुरूष १ लाख ६२ हजार ४६७, महिला- १ लाख ६६ हजार ५९, तृतीयपंथीय -४६, एकुण ३ लाख २८ हजार ५७२, सैनिक मतदार-८१, ८५ वर्षावरील मतदार- ४ हजार १२८.

मतदार संघ २४९- सोलापूर शहर मध्य, एकुण मतदान केंद्रांची संख्या - ३०४, पुरूष १ लाख ७० हजार ५०९, महिला- १ लाख ७६ हजार ११५, तृतीयपंथीय -५३, एकुण ३ लाख ४६ हजार ६७७, सैनिक मतदार-४५, ८५ वर्षावरील मतदार- ३ हजार ८०९.

मतदार संघ २५०- अक्कलकोट, एकुण मतदान केंद्रांची संख्या - ३९६, पुरूष १ लाख ९६ हजार ५७७, महिला- १ लाख ८६ हजार ८६९, तृतीयपंथीय -४३, एकुण ३ लाख ८३ हजार ४७९, सैनिक मतदार-४३४, ८५ वर्षावरील मतदार- ४ हजार ३४२.

मतदार संघ २५१-सोलापूर दक्षिण, एकुण मतदान केंद्रांची संख्या - ३६७, पुरूष १ लाख ९५ हजार ७५१, महिला- १ लाख ८६ हजार ९६४, तृतीयपंथीय -३९, एकुण ३ लाख ८२ हजार ७५४, सैनिक मतदार-२४०, ८५ वर्षावरील मतदार- ३ हजार ३५६.

मतदार संघ २५२-पंढरपूर, एकुण मतदान केंद्रांची संख्या - ३५७, पुरूष १ लाख ९१ हजार ४६४, महिला- १ लाख ८२ हजार १९४, तृतीयपंथीय -२६, एकुण ३ लाख ७३ हजार ६८४, सैनिक मतदार-५४१, ८५ वर्षावरील मतदार- ५ हजार ३३०.

मतदार संघ २५३-सांगोला, एकुण मतदान केंद्रांची संख्या - ३०९, पुरूष १ लाख ७२ हजार ७०४, महिला- १ लाख ६० हजार ७८४, तृतीयपंथीय -०५, एकुण ३ लाख ३३ हजार ४९३, सैनिक मतदार-८८६, ८५ वर्षावरील मतदार- ४ हजार २२३.

मतदार संघ २५४-माळशिरस (अ.जा), एकुण मतदान केंद्रांची संख्या - ३४५, पुरूष १ लाख ८० हजार ३२२, महिला- १ लाख ६९ हजार २१४, तृतीयपंथीय -३२, एकुण ३ लाख ४९ हजार ५६८, सैनिक मतदार-४००, ८५ वर्षावरील मतदार- ४ हजार ६९९

एकुण मतदान केंद्रांची संख्या - ३ हजार ७३८, पुरूष १९ लाख ७१ हजार ८३१, महिला- १८ लाख ७६ हजार ७२८, तृतीयपंथीय -३१०, एकुण ३८ लाख ४८ हजार ८६९, सैनिक मतदार-४ हजार ४३६, ८५ वर्षावरील मतदार- ५२ हजार ७६६. दि. २९/१०/२०२४ रोजी एकूण पुरूष मतदार १९,७१,८३१, स्त्री मतदार १८,७६,७३८ व इतर मतदार ३१० असे एकूण ३८,४८,८६९ एवढे मतदार व ४४३६ सैनिक मतदार आहेत. जिल्हयाचा एझ ीरिंळे दि. २९/१०/२०२४ रोजी ७८.६७% एवढा आहे. ऋशपवशी ीरींळे हा ९५२ आहे. जिल्हयामध्ये १८-१९ वयोगटातील एकूण मतदार १,०४,६३४ (२.७२%) असून २०-२९ वयोगटातील मतदार हे ८,१०,४७१ इतके आहेत. ८५ वर्षावरील मतदारांची संख्या हि ५२,७६६ असून PWD मतदार संख्या हि २९,९८९ इतकी आहे. सोलापूर जिल्हयामध्ये एकूण मतदान केंद्र ३७३८ (शहरी ११८३ व ग्रामीण २५५५) असून, ३७२३ मतदान केंद्रस्तरीय अधिकारी आहेत. आचार संहितेबाबत काही तक्रारी असल्यास त्यासाठी C-vigil app वापरावे, असे जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी, सोलापूर यांनी केले असून Cash seize करणे, liquor seize करणे तसेच इ. तत्सम कामासाठी ESMS app वापरण्यात येणार आहे. तसेच सोलापूर जिल्हयासाठी एक Control room स्थापन करण्यात आली असून, जिल्हा स्तरावर १९५० हा toll free नंबर हा रलींर्ळीरींश करण्यात येत असून त्याच धर्तीवर मतदार संघ निहाय स्वतंत्र Control room स्थापन करण्यात आलेले आहेत. विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ यासाठी लागणाऱ्या सर्व परवानग्या घेण्यासाठी मतदार संघ निहाय एक खिडकी योजना व Suvidha प्रणालीद्वारे अर्ज सादर करणेची सोय करण्यात आली आहे. जिल्हयातील ११ विधानसभा मतदार संघातील सर्व मतदारांनी बुधवार दिनांक २० नोव्हेंबर २०२४ रोजी होणाऱ्या मतदानामध्ये आपला सहभाग नोंदवून आपले बहुमूल्य मत मतदानाद्वारे नोंदवून राष्ट्रीय कर्तव्य पार पाडावे, असे आवाहन जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी केले आहे.

## थोडक्यात...

### डोणजच्या ए. एम. स्पोर्टस्ला विजेतेपद, सोलापूर जिल्हा किशोर गट खो-खो स्पर्धा

सोलापूर : डोणजच्या ए. एम. स्पोर्टस क्लबने जिल्हा किशोर गट खो-खो स्पर्धेचे विजेतेपद पटकाविले. कै. अंबिर मुल-ाणी यांच्या दहाव्या पुण्यस्मरणार्थ जि. प. प्रा. शाळा डोणज येथे ही स्पर्धा पार पडली. अंतिम सामन्यात ए. एम स्पोर्ट्स, डोणजने छत्रपती खो-खो क्लब मरवडे संघास हरविले.दीनबंधू मंद्रूप क्लबने तृतीय तर आदर्श खो-खो क्लब शेवतेने संघास चतुर्थ स्थान संपादिले. विजयी संघाकडून डोणजच्या वैभव कोळी व रोहन आनंदपुरे यांनी उत्कृष्ठ संरक्षण केले. तसेच तुषार कोरे, विनायक स्वामी, रघुवीर मंटूर, चन्नवीर मंटूर, कट्टीमनी यांनी धारदार आक्रमणाचा करीत विजयश्री खेचून आणली. उपविजयी मरवडे संघाकडून समर्थ कुंभार व संकेत बावचे यांची लढत अपुरी पडली. सोलापर म्युचर खो-खो असोसिएशनचे निरीक्षक विजय दत्तू, कृष्णा कोळी, दामाजी शुगर संचालक अशोक केदार, दामाजी शुगर चेअरमन शशिकांत बुगडे, स्वा. शे. सं तालुका अध्यक्ष श्रीमंत केदार, मा. ग्रा. पं. सदस्य रमेश केदार, दुर्योधन पुजारी, शिवानंद पुजारी, बसवराज आनंदपुरे, प्र. संघटना सरचिटणीस सागर पाटी, मेजर सोमलिंग पुजारी, संतोष मलगोंडे, विठ्ठल बगले यांनी विजेते संघाचे अभिनंदन केले. या स्पर्धा यशस्वी करण्यासाठी ए. एम स्पोर्ट्सचे मार्गदर्शक तथा युटोपियन शुगर्सचे-स्टोअर अकौंटंट सुनिल पुजारी, संयोजक अनिल लिगाडे, आण्णाप्पा बिराजदार, रोहित लिगाडे, राहुल भोसले, अप्पू बाळगे, संदीप आनंदपुरे, सागर आनंदपुरे, अनिल कोळी, अविनाश कोळी, सागर बगले, आमसिध्द कोळी, अमोल केदार यांचेसह डोणज ग्राम स्थांनी परिश्रम घेतले.

# धाराशिव-तुळजापूर रेल्वेमार्गाचे सात किलोमीटरचे पायाभूत काम पूर्ण

## दहा पोकलेन मशीन, ८० हायवा टिप्पर आणि ३०० कामगार रात्रंदिवस कार्यरत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

धाराशिव/प्रतिनिधी : धाराशिव-तुळजापूर या अनेक वर्षांपासून प्रलंबित राहिलेल्या रेल्वेमार्गाचे काम सध्या युद्धप-ातळीवर सुरू आहे. १० पोकलेन मशीन, ८० हायवा टिप्पर आणि ३०० कामगारांच्या सहाय्याने रात्रंदिवस काम सुरू आहे. एकूण



### आमदार राणाजगजितसिंह पाटील यांची माहिती

तीस किलोमीटर अंतराच्या रेल्वेमार्गापैकी सात किलोमीटरचे पायाभूत काम पूर्ण झाले आहे. कामच वेग असाच कायम राहिल्यास,आपण ठरविलेल्या उद्दिष्टानुसार पुढील २४ महिन्यांच्या आत कुलस्वामिनी तुळजाभवानी देवीच्या तीर्थक्षेत्रापर्यंत रेल्वेम ार्गाचे काम नक्की पूर्ण होईल असा विश्वास आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी व्यक्त केला आहे.

अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेले तुळजापुर रेल्वेचे स्वप्न आता प्रत्यक्ष साकार होत आहे. एकूण ८४ किलोमीटर लांबीच्या रेल्वेमार्गाच्या कामाचे तीन टप्पे करण्यात आले आहेत. धाराशिव ते तुळजापूर या पहिल्या टप्प्यातील ३० किलोमीटर ब्रॉडगेज रेल्वेमार्गाच्या कामास सप्टेंबरच्या पहिल्या आठवड्यात प्रारंभ झाला. वाहन व यंत्रांचे नारळ फोडून आपण पूजन केले होते. सध्या उपळा ते सांजा दरम्यान सहा किलोमीटर अंतराचे तर पळसवाडी परिसरात एक किलोमीटरचे पायाभूत काम पूर्ण झाले आहे. पुढील कामही मोठ्या वेगात सुरू आहे. या नवीन रेल्वेमार्गाचे काम खरतर २०१९ सालीच सुरू होणे अपेक्षित होते. मात्र त्यावेळी ठाकरे सरकारने राज्याच्या वाट्याचा पन्नास टक्के निधी उपलब्ध करून दिला नव्हता. त्यामुळेच अडीच वर्षे हे काम रखडले होते. राज्यात आपले महायुती सरकार आल्यानंतर या रेल्वेमार्गासाठी ४५२.४६ कोटी रुपयांच्या निधीला मंजुरी देण्यात आली. त्यामुळे प्रत्यक्ष कामाला गती आली आहे. सुरूवातीला पाच वर्षात हे काम पूर्ण करण्याचे ठरविण्यात आले होते. मात्र आता तीन टप्प्यांत कमी कालावधीत हे काम पूर्ण करण्यात येणार आहे. पहिल्या टप्प्याचे काम प्रगतीप-थावर आहे. उर्वरित दोन टप्प्यांचे कामही लवकरच हाती घेण्यात येणार असल्याची माहितीही आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली आहे. पुढील दोन वर्षांच्या आत पहिल्या टप्प्याचे काम पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठरविण्यात आले आहे. ज्या गतीने आत्ता काम सुरू आहे, ते पाहता ठरविलेल्या उद्दिष्टानुसार नक्की काम पूर्ण होईल असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. पहिल्या टप्प्यातील कामासाठी धाराशिव तालुक्यातील नऊ आणि तुळजा-पूर तालुक्यातील १५ गावांमधील ४९४.२६ हेक्टर जमिनीचे भूसंपादन करण्यात आले आहे. पुढील टप्प्यात बोगद्याच्या कामांना हाती घेण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

### एकूण अंतर ८४ किलोमीटर; ११० पूल आणि तीन मोठे उड्डाणपूल

सोलापूर-तुळजापूर-धाराशिव या एकूण ८४ किलोमीटर लांबीच्या रेल्वेमार्गाचे तीन टप्पे करण्यात आले आहेत. त्यात धाराशिव जिल्ह्यातील कामाचे दोन स्वतंत्र टप्पे केले आहेत. या रेल्वेमार्गावर एकूण ११० पूल आणि तीन मोठे उड्डाणपूल असणार आहेत. सोल-ापूर आणि धाराशिव जिल्ह्यातील ३२ गावांतील एक हजार ३७५ एकर जमीन त्यासाठी भूसंपादीत करण्यात आली आहे. संपादीत जमिनीच्या वाढीव मावेजासाठी दोन्ही जिल्ह्यातील जिल्हाधिकार्यांची लवाद अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आली आहे.

### धाराशिव-तुळजापूर ब्रॉडगेजसाठी ५४४ कोटींचा खर्च

पहिल्या टप्प्यातील ३० किलोमीटरच्या ब्रॉडगेज रेल्वेमार्गासाठी ५४४ कोटी रूपयांचा निधी खर्च केला जाणार आहे. जास्तीत जास्त २४ महिन्यांच्या आत हा रेल्वेमार्ग पूर्ण करण्याचे उद्दिष्ट निर्धारित करण्यात आले आहे. या मार्गावर सांजा, वडगाव आणि तुळजापूर, असे तीन नवीन रेल-वेस्थानक उभारले जाणार आहेत. या रेल्वेमार्गामुळे तुळजाभवानी देवीचे तीर्थक्षेत्र रेल्वेच्या राष्ट्रीय नकाशावर येणार आहे.

### तीन नवीन रेल्वेस्थानक

धाराशिव-तुळजापूर या ३० किलोमीटर रेल्वेम ार्गावर तीन नवीन रेल्वेस्थानके उभारली जाणार आ-हेत. धाराशिव ते सांजा या १० किलोमीटर अंतरावर सांजा येथे पहिले रेल्वे स्थानक असणार आहे. सांजा ते वडगाव या १२ किलोमीटर अंतराच्या टप्प्यावर दुसरे रेल्वेस्थानक तर वडगाव ते तुळजापूर या आठ किलोमीटर अंतरावर तिसरे स्थानक उभारले जाणार आहे. या रेल्वेमार्गावर एकूण चार स्थानके असणार आहेत. त्यात धाराशिव येथील सध्या अस्तित्वात असलेल्या मुख्य रेल्वेस्थानकाचाही समावेश आहे. मुख्य रेल्वेस्थानकाच्या पुनर्विकासासाठी नुकतेच नरेंद्र मोदी यांच्या सरकारने २१ कोटी रुपयांचा निधी सुपूर्द केला असल्याचेही आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी सांगितले.

# सचिन कल्याणशेट्टी व आनंद तानवडे यांच्यात दिलजमाई ; या नेत्यांची मध्यस्थी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : विधानसभा निवडणुकीदरम्यान अनेक राजकीय घडामोडी पहायला मिळत आहेत एकमेकांचे कट्टर विरोधक ही एकत्र येत आहेत. एकाच पक्षात असून दुखाव-लेली म्हणे जुळत आहेत. अक्कलकोट विधानसभा मतदारसंघात भाजपसाठी एक चांगली बातमी समोर आली आहे. विद्यमान आमदार तथा अक्कलकोट भाजपचे उमेदवार सचिन कल्याणशेट्टी आणि भाजपचे माजी जिल्हा परिषद पक्षनेते आनंद तानवडे यांच्यात दिलजमाई झाली आहे.



अक्कलकोट विधानसभा निवडणुकीत आमदार सचिन कल्याणशेट्टी विरुद्ध काँग्रेसचे माजी मंत्री सिद्धाराम म्हेत्रे यांच्यात दुरंगी लढत होत आहे. २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत सचिन कल्याणशेट्टी यांच्या सोबत राहिलेले माजी आमदार सिद्रामप्पा पाटील यांनी सिद्धाराम म्हेत्रे यांना पाठिंबा दिला आहे त्यामुळे हा भाजपला मोठा धक्का मानला जातो.

परंतु दुसरीकडे एकाच पक्षातील तानवडे कल्याणशेट्टी या दोन नेत्यांमध्ये असलेले तात्विक मतभेद विसरून हे दोन्ही नेते आता एकत्र येत आहेत. यासाठी उस्मानाबाद जिल्हा मध्यवर्ती बँकेचे चेअरमन बापूराव पाटील आणि सिध्देश्वर कल्याणशेट्टी, महेश हिंडोळे यासह जेष्ठ सदस्याच्या शिष्टमंडळाने पुढाकार घेतला. या तिघांमध्ये बैठक झाली.

मंगळवार आमदार सचिन कल्याणशेट्टी यांचा वाढदिवस असून त्या दिवसापासून तानवडे हे त्यांच्या प्रचारार्थ सक्रिय होणार असल्याची माहिती स्वतः त्यांनी दिली. याप्रकरणी आपले नेते आमदार विजयकुमार देशमुख यांच्यासोबत सुद्धा बोलणे झाले आहे असे तानवडे यांनी सांगितले. तानवडे सोबत आल्याने कल्याणशेट्टी यांना निश्चितच फायदा होईल यात शंका नाही.

# देऊळगाव मही येथील भुमापक कार्यालय कार्यालयीन वेळेत बंद, नागरिकांची तारांबळ; कामे खोळंबली!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी /राहुल साबळे : देऊळगाव राजा तालुक्यातील आति महत्वा-चे गाव म्हणून देऊळगाव मही प्रसिद्ध आहे सध्या सगळीकडे विधानसभा निवडणुकीची धामधूम सुरू असताना महसुल,पंचायत समि ती तसेच जिल्हा परिषदचे कर्मचारी आदर्श आचारसंहिततेचे पालन करत कामात व्यस्त असताना काही कामचुकार महाभाग मिळेल त्या संधीचे सोने करणारे काही महाभाग जिल्हात किंवा तालुक्यात तथा प्रत्येक ठिकाणी पहावयास मिळतात.याचाच प्रत्यय देऊळगाव राजा तहसील अंतर्गत येणारे तालुका भुमि अभिलेख कार्यालया अंतर्गत देऊळगाव मही येथे भुमापक कार्यालय नझुल आफीस असुन दि.५ नोव्हेंबर २०२४ रोजी सदर कार्यालय कार्यालयीन वेळेत भर दिवसा पुर्णवेळ बंद असल्याचे निदर्शनास आले.देऊळगाव मही येथील कार्यालय हे आठवड्यातून सोमवार आणि मंगळवार या दोन दिवस उघडले जाते त्यामुळे या कार्यालयात नेहमी कामानिमित्ताने आलेल्या नागरिकांची वर्दळ असते परंतु काही कामचुकार कर्मचारी हे कार्यालय बंद ठेवून व्यक्तीगत कामे करत आहेत .याकडे वरिष्ठ अधिकाऱ्याचे दुर्लक्ष होत आहे.




### वरीष्ठ अधिकारी यांनी लक्ष देण्याची गरज

याबाबत येथे कार्यरत असणारे कर्मचारी श्री कैलास जुमडे यांना भ्रमणध्वनीवरून संपर्क साधला असता कार्यालय बंद का आहे असे विचारले असता सुरुवातीला मी कार्यालयीन कामासाठी बाहेर आलो असल्याचे नंतर यु टर्न घेत मी आज सुट्टीवर असल्याचे सांगितले.तसेच तुम्हाला काय तक्रार करायची ते करा असे उध्दटपणाची भाषा केली. याबाबत देऊळगाव राजा भुमि अभिलेख कार्यालयाचे उपअधीक्षक विजय मईनकर यांना संपर्क साधला असता मी चिखली येथे असुन माझ्याकडे देऊळगाव राजाचा अतिरिक्त पदभार असुन याबाबत चौकशी करुन योग्य ती कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले.याबाबत वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सखोल चौकशी करून कामचुकार कर्मचाऱ्यांवर योग्य ती कार्यवाही करावी अशी मागणी सामान्य नागरिकांकडून होत आहे.

# विधानसभा निवडणूक आचारसंहिता लागल्याने उल्हासनगर पोलीस अधिकारी यांचे रूट मार्च आयोजन व नागरिकांना आवाहन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

उल्हासनगर प्रतिनिधी/ बाळासाहेब अहिरे : आज दि. ०४/११/२०२४ रोजी १७:०५ ते १८:३० वाजेचे दरम्यान आगामी विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने उल्हास-नगर पोलीस स्टेशन हद्दीमध्ये रूट मार्च घेण्यात आला. सदरचा रूट मार्च पोलीस ठाणे हद्दीतील मिश्र वस्ती, मतदान केंद्र व बूथ अस-लेला परिसर या भागामध्ये घेण्यात आला. रूट मार्च दरम्यान चौका चौकामध्ये विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने आदर्श आचार संहिता लागू करण्यात आलेले असून कोठेही आ-



चार संहिताचे उल्लंघन होत असल्याचे आढळून आल्यास तात्काळ डायल ११२ किंवा समक्ष पोलीस स्टेशन येथे येऊन तक्रार द्यावी याबाबत नागरिकाम ध्ये मेगा फोनद्वारे जनजागृती करण्यात आली तसेच विधानसभा निवडणूक ही शांततेत व भयमुक्त वातावरणात पार पाडण्यात यावी याकरिता नागरिकांना आव्हान करण्यात आले.

रूट मार्च चा मार्ग - उल्हास-नगर पोलीस स्टेशन हद्दीतील भैय्यासाहेब आंबेडकर चौकी - दुर्गा नगर- देशमुख नगर-हनुमान नगर- दुर्गामाता मंदिर हनुमान नगर - श्रीराम चौक-जेतवन बुद्ध विहार समोरून- रम ाबाई आंबेडकर नगर- डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर नगर खेमानी चौक येथे समाप्त करण्यात आला.

*सदर रूट मार्च मध्ये मा. सहाय्यक पोलीस आयुक्त ,उल्हासनगर विभाग.पोनि/ चंद्रहार गोडसे ( गुन्हे ),*सी.आय. एस.एफ. चे ०१ अधिकारी २४ अंमलदार तसेच उल्ह-ासनगर पोलीस स्टेशनचे ४ अधिकारी व २० अंमलदार उपस्थित होते.

# तीन दिवस होणार पंढरपूर मतदारसंघातील उमेदवारांची खर्च लेखा तपासणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार विधानसभा निवडणूक - २०२४ च्या अनुषंगाने २५२ पंढरपूर विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढविणा-या सर्व उमेदवारांची निवडणूक खर्च लेखा तपासणी ८, १२ व १६ नोव्हेंबर २०२४ रोजी करण्यात येणार आहे. सदर खर्च तपासणी वेळी उमेदवार किंवा त्यांच्या प्रतिनिधींनी उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

लोकप्रतिनिधीत्व अधिनियम १९५१ मधील कलम ७७ मधील तरतुदीनुसार निवडणूक लढविणा-या उमेदवारांनी त्यांच्या निवडणूक

### उमेदवार किंवा त्यांच्या प्रतिनिधींनी उपस्थित राहण्याचे आवाहन

खर्चाचे अभिलेखे उपलब्ध करून देणे अपरिहार्य आहे. त्यानुसार प्रथम खर्च लेखा तपासणी शुक्रवार दि. ८ नोव्हेंबर २०२४ रोजी सकाळी १० ते सायं ५ वाजेपर्यंत, द्वितीय खर्च लेखा तपासणी मंगळवार, दि. १२ नोव्हेंबर २०२४ रोजी सकाळी १० ते सायं. ५ वाजेपर्यंत तर तृतीय खर्च लेखा तपासणी शनिवार दि. १६ नोव्हेंबर २०२४ रोजी सकाळी १० ते सायं. ५ वाजेपर्यंत शेतकी भवन, पंचायत समिती, पंढरपूर येथे करण्यात येईल.

२५२-पंढरपूर विधानसभा मतदारसंघाचे निवडणूक खर्च निरीक्षक के.पी. जेयकर हे वरील दिनांकास व वेळेस शेतकी भवन, पंचायत समिती, पंढरपूर येथे खर्च तपासणीकरीता उपलब्ध राहण-ार आहे. जे उमेदवार खर्चाचे लेखे तपासणीकरीता सादर करणार नाही, त्यांच्यावर निवडणूक आयोगामार्फत योग्य ती कार्यवाही करण्यात येईल, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी, असे २५२ पंढरपूर विधानसभा निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी सचिन इथापे यांनी कळविले आहे.

**इंदापुरमध्ये पाटील घराण्यातच फुट..!**

**हर्षवर्धन पाटलांना मोठा धक्का**

# हर्षवर्धन पाटलांना घरातून मोठा विरोध; हर्षवर्धन पाटलांच्या बंधूनी दिला प्रवीण मानेंना पाठिंबा !

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंदापूर प्रतिनिधी/अतुल सोनकांबळे

हर्षवर्धन पाटील यांना सत्ता त्यांच्या मुला-मुलींच्या हातात द्यायची आहे. इंदापूर विधानसभा मतदारसंघात राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार हर्षवर्धन पाटील यांना मोठा धक्का त्यांच्या घरातूनच मोठा विरोध करत हर्षवर्धन पाटलांच्या बंधूनी प्रवीण मानेंना पाठिंबा दिला आहे.भाजपमधून शरद पवार यांच्या राष्ट्रवादीमध्ये आलेल्या हर्षवर्धन पाटील यांना इंदापूरमधून उमेदव-ारी देण्यात आली होती. त्यानंतर हर्षवर्धन पाटील यांच्या उमेदवारीला विरोध करत प्रवीण माने यांनी वेगळी चूल मांडली होती. हर्षवर्धन पाटील यांच्याविरोधात प्रवीण माने यांनी अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला. त्यानंतर आता हर्षवर्धन पाटील यांचे चुलत बंधू मयूर पाटील यांनी त्यांची साथ सोडली आहे. मयूर पाटील यांनी अपक्ष उमेदवार प्रवीण माने यांना पाठिंबा दिला आहे.

मयूर पाटील यांनी साथ सोडल्यानंतर हर्षवर्धन पाटील यांना मोठा धक्का बसला आहे. हर्षवर्धन



पाटील यांना उमेदवारी जाहीर झाल्यापासून इंदापूरातील राजकारण सातत्याने बदलत आहे. हर्षवर्धन पाटील यांना उमेदवारी मिळाल्यानंतर प्रवीण माने, भरत शहा आणि आप्पासाहेब जगदाळे यांनी शरद पवार गटाची साथ सोडली होती. त्यानंतर आता मयूर पाटील यांनी हर्षवर्धन पाटील यांची साथ सोडत परिवर्तन विकास आघाडीच्या प्रवीण माने यांना पाठिंबा दिला आहे.

इंदापूर कृषी उत्पन्न बाजार समीतीचे माजी सभापती मयूर पाटील यांनी पत्रकार परिषद घेत प्रवीण माने यांना पाठिंबा दिला. इतर उमेदवारांच्या तुलनेत प्रवीण माने यांना जनतेचा जास्त पाठिंबा आहे. आताचे उमेदवार मलिन प्रतिम ेचे आहेत आणि लोकांना आता बदल हवा आहे. जनता आता नको आजी नको माजी इंदापुरकरांना हवा नवा बाजी असे म्हणत आहे.

जे विचार घेऊन मी काम करत होतो त्यांना तिलांजली देण्याचे काम आमच्या घरातल्या लोकांनी केल्याचा आरोप ही मयुर पाटिल यांनी केला. त्यामुळे तालुक्याची विल्हेवाट लागायला लागली आहे. सहकारी संस्था हुकूमशाही पद्धतीने चालवण्यात आल्या. आम्ही काम करत होतो तेव्हा वरुन आदेश आल्याशिवाय काही होत नव्हतं. त्यांनी मंत्रिपदाचा, आमदाराकीचा उपयोग तालुक्याच्या विकासासाठी करणं आवश्यक होतं. पण तसं चित्र दिसलं नाही, अशी टीका मयूर पाटील यांनी केली.

दरम्यान, इंदापूरची विधानसभा निवडणूक हर्षवर्धन पाटील आणि दत्तात्रय भरणे यांच्यात होईल असं सुरुवातीपासून वाटत होतं. प्रवीण माने यांच्या बंडखोरीने ट्विस्ट आला. गेल्या निवडणुकीत प्रवीण माने हे दत्ता भरणेंसोबत होते. त्यानंतर आता अपक्ष उमेदवारी दाखल करत प्रवीण माने यांनी सर्वांना धक्का दिला आहे.